

नोंदणी क्र. ए-६३५/१९६७, अहिल्यानगर

# श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे

## (श्रीक्षेत्र मोहटादेवी)

ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर पिन -४१४ १०२
Email :- jagdambadevi@gmail.com

# निवीदा क्र. ०७/२०२६ .

## कंत्राटी पद्धतीने माजी सैनिक सुरक्षा रक्षक ,सिव्हीलीअन सुरक्षा रक्षक, स्वयंपाकी (आचारी), सफाई कामगार, चालक,वायरमन, रोजंदारी सेवक, कम्पौंडर इ.सेवा सेवाशुल्क पध्दतीने पुरविणेबाबतची निवीदा

निवीदा प्रसिध्द दिनांक १२ मार्च २०२६

## जाहिरात तपशील



नोंदणी क्र. ए-६३५/१९६५, अहिल्यानगर

**श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे**

ता.पाथर्डी, ४१४१०२ जि.अहिल्यानगर. फोन नं. ०२४२८-२३२१००, ७७४४९२०२२२

www.shrimohatadevi.org, Email id - jagdambadevi@gmail.com

# जाहीर निवीदा

श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे यांना माजी सैनिक सुरक्षा रक्षक व इतर सेवा कंत्राटी पध्दतीने व आवश्यकतेप्रमाणे पुरविण्यासाठी अनुभवी, शासन नोंदणीकृत व परवानाधारक कंत्राटदाराकडून सर्व समावेशक सेवाशुल्क दराची जाहीर निवीदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | मनुष्यबळच्या तपशील | संख्या | बयाणा रक्कम रूपये | कामाची मुदत | कोरा निवीदा फॉर्म किंमत रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा सुपरवायझर (माजी सैनिक) | ०१ | ५०,०००/- ( रूपये पन्नास हजार मात्र ) | ११ महिने | २,०००/- ( रूपये दोन हजार मात्र ) विनापरतावा |
| २ | माजी सैनिक सुरक्षा रक्षक | १५ | | | |
| ३ | सुरक्षा रक्षक ( सिव्हीलीयन) | ५ | | | |
| ४ | आचारी | १ | | | |
| ५ | तारतंत्री ( वायरमन ) | २ | | | |
| ६ | सफाई कामगार | ५ | | | |
| ७ | स्त्री व पुरूष मजुर<br>कामाचे स्वरूपानुसार आवश्यकते नुसार ( प्रति दिवसाप्रमाणे ) | ११ | | | |
| ८ | कंपौंडर / ब्रदर / नर्सिंग स्टाफ | १ | | | |

१. निविदा विक्री दिनांक - **दि. १३ / ०३ / २०२६ पासून दि. २४ / ०३ / २०२६ पर्यंत**

२. निविदा स्विकृती अंतिम दिनांक - **दि.२४ / ०३ / २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजेपर्यंत**

**निवीदाधारकांसाठी सूचना १**. जाहिरात प्रसिध्द झालेपासून कोरे निविदा फॉर्म देवस्थान कार्यालयात कार्यालयीन वेळेत रोख रक्कम भरणा करून मिळतील अथवा देवस्थानचे संकेतस्थळ www.shrimohatadevi.org येथून डाऊनलोड करता येतील. कोरे निवीदा फॉर्म फी ऑनलाईन अथवा रोखीने देवस्थानकडे जमा करावी त्यांचे पावतीची सत्यप्रत निवीदेसोबत सादर करावी.२.निविदेची बयाणा रक्कम (ईएमडी) श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे या नावे भारतीय स्टेट बँक, शाखा-पाथर्डी येथील खाते क्र. 36705343022( IFSC CODE- SBIN0001307) वर आरटीजीएस / एनईएफटी / ऑनलाईनव्दारे जमा करावी.त्याची पावतीची सत्यप्रत निविदा अर्जासोबत दाखल करणे आवश्यक आहे. ३.मुदतीनंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. ४. निविदा उघडणेबाबत दिनांक व वेळ इ.निविदाधारकांस कळविण्यात येईल. ५. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे किंवा निविदेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे अधिकार संस्थानने राखून ठेवले आहेत.

( सुरेश भणगे )

**स्थळ - श्रीक्षेत्र मोहटादेवी** — **मुख्य कार्यकारी अधिकारी**

**जाहिरात क्र. ०७ / २०२६** — श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे

# श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे

## कंत्राटी पध्दतीने सेवाशुल्क पध्दतीने मनुष्यबळ पुरविणेबाबत.

## -: निविदेच्या शर्ती व अटी :-

| | |
|---|---|
| १ | ज्या निवीदाधारकांची / ठेकेदारांची ठेकेदारी मनुष्यबळ पुरविण्याची क्षमता किमान २०० संख्येपेक्षा जास्त आहे, ज्यांना किमान तीन वर्षांचा पुर्वानुभव आहे व ज्यांची वार्षिक उलाढाल किमान रूपये एक कोटी रक्कमेपेक्षा जास्त आहे अशा निवीदाधारकांच्या / ठेकेदारांच्या निवीदा विचारात घेतल्या जातील. या अटी पुर्ण न करणाऱ्या निवीदाधारकांच्या निवीदा अपात्र समजणेत येऊन, त्या नाकारणेत येईल. ( सोबत वार्षीक उलाढालीबाबत सनदी लेखापरीक्षक यांचे प्रमाणपत्र व आयकर भरणा पावती जोडावी.) |
| २ | सुरक्षा मनुष्यबळपुरविणाऱ्या ठेकेदाराकडे / निवीदाधारकाकडे प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सीज (रेग्युलेशन ) ॲक्ट, २००५ व महाराष्ट्र प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सीज ( रेग्युलेशन ) रूल्स, २००७ चे तरतुदीस अनुसरून पोलीस कमीशनर ऑफीस व कंन्ट्रोलींग ॲथॉरिटी ( महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी लागू केलेल्या परवानग्या इ. ) यांचेकडील फॉर्म नं.VI मधील प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सी लायसेन्स, पसारा नोंदणी इ. सर्व आवश्यक परवानग्या, प्रमाणपत्रे इ. असणे आवश्यक असुन, ते त्यांचेवर नियमानुसार बंधनकारक आहे. तसेच सदर सुरक्षा एजन्सीकडे सुरक्षा गार्ड बोर्ड एक्झमशन सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे. |
| ३ | निवीदांसाठी अर्ज करणारा कंत्राटदार व त्यांचेमार्फत नेमू इच्छिणारे कंत्राटी कामगार हे भाविक प्रवृत्तीचे असले पाहिजेत. तसेच संस्थानमध्ये दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांशी नम्रतेने व तत्परतेने सेवा देणारे असावेत. भाविकांशी उध्दट, बेशिस्त वर्तन तसेच इतर गैरशिस्तवर्तन करणारे कंत्राटी कामगारांना तात्काळ विनानोटीस व विना नुकसान भरपाई कामावरून बंद करणेची जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर राहील. |
| ४ | सुरक्षा कंत्राटदार व त्यांचेमार्फत नेमण्यात येणारे सुरक्षा रक्षक व इतर सेवक यांना मराठी बोलता आले पाहिजे. यासाठी सदर कंत्राटदार व त्यांच्यामार्फत नेमण्यात येणारे सुरक्षा रक्षक यांचा मागील कामाचा अनुभव, ज्या-ज्या ठिकाणी काम केले त्या त्या ठिकाणच्या कामांचा तपशिल दिला पाहिजे. |
| ५ | कंत्राटदाराने त्यांचेमार्फत नेमलेल्या कंत्राटी कामगारांवर नियंत्रण ( कंन्ट्रोल ) व देखरेख (सुपरव्हिजन) ठेवणेची जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर राहील. कंत्राटदार अथवा त्याने पुरविलेले कंत्राटी कामगार व संस्थान यांचेमध्ये मालक व नोकर असा कोणताही संबंध राहणार नाही अथवा कोणत्याही परिस्थितीत तो प्रस्थापित होणार नाही. |
| ६ | कंत्राटदार अथवा त्याने पुरविलेले कंत्राटी कामगार यांनी संस्थानच्या आवारात कोणतेही स्वरूपाचे गैरवर्तन केले अथवा शिस्तीस बाधा येईल असे कोणतेही वर्तन केल्यास, असे गैरवर्तन केलेले कामगार कंत्राटदाराने संस्थानला पुरवु नये. तसेच असे प्रकार वारंवार घडल्यास विना नुकसान भरपाई व विना नोटीस संबंधीत लेबर व सिक्युरिटी एजन्सीचे कंत्राट तात्काळ रद्द करण्याचा हक्क व अधिकार संस्थान राखुन ठेवत आहे. |
| ७ | कंत्राटदारामार्फत पुरविलेले कंत्राटी कामगारांनी कोणतेही गैरकृत्य केल्यास किंवा संस्थानचे मिळकतीस इजा / हानी पोहोचविल्यास त्याबाबतची संपुर्ण नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदार यांचेवर राहील. कामावर असतांना झोप घेणे, दुर्लक्ष करणे, जुगार अथवा कोणत्याही माध्यमाने |

| | |
|---|---|
| | वेळकाढुपणा करणे इ. बेजबाबदारपणा केलेस त्यास ठेकेदार जबाबदार राहील. |
| ८ | ज्या परिसर / विभागाची संरक्षणाची जबाबदारी कंत्राटदार व त्याने पुरविलेल्या सुरक्षा रक्षकावर सोपवलेली असेल त्या विभागात अगर परिसरात चोरी झाल्यास, मारामारी झाल्यास अथवा कोणतेही बेशिस्त व अनुचित वर्तन झाल्यास अगर संस्थान मालमत्तेची हानी व नुकसान झाल्यास त्यासाठी कंत्राटदार नुकसान भरपाईसाठी अगर इतर कायदेशीर बाबींसाठी जबाबदार राहील. |
| ९ | संस्थान मालमत्तेचे संरक्षणाव्यतिरिक्त, संस्थान परिसरात अनाधिकृत वाहतुकदार, खाजगी विक्रेत्यांना येण्यापासुन व विक्री करण्यापासुन प्रतिबंध करणे, हॉटेल्स एजंन्ट, ट्रॅव्हलींग एजंन्टस, फुल दुकानदारांचे एजंन्टस, लॉटरी टिकीट विक्रेते, पेपर विक्रेते, भिकारी यांना संस्थान परिसरात येणेस मज्जाव / प्रतिबंध करणे तसेच अनाधिकृत पार्किंगवर प्रतिबंध घालणे व इतर तत्सम दक्षता संबंधीत सुरक्षा एजन्सीला व त्यांचे सुरक्षा कर्मचाऱ्यांना घ्यावी लागेल. |
| १० | .कंत्राटदाराकडुन संस्थानला पुरविण्यात येणारे कंत्राटी कामगारांची निवासाची व्यवस्था संबंधीत कंत्राटदारास स्वतः करावी लागेल. कंत्राटी कामगारांची निवासव्यवस्था करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही. तथापि, उपलब्धतेनुसार, लेखी विनंतीनुसार नाममात्र भाडेतत्वावर एकत्रित निवासासाठी संस्थान नियमानुसार, कॉमन हॉल देणेबाबत उपलब्धेतनुसार संस्थानकडुन विचार करणेत येईल. |
| ११ | संस्थानला आवश्यकतेप्रमाणे व गरजेप्रमाणे पुरेसे संख्येने अकुशल, कुशल कामगार , सुरक्षा मनुष्यबळ व माजी सैनिक सुरक्षा मनुष्यबळकंत्राटी पध्दतीने पुरविणे संबंधीत निवीदाधारकावर बंधनकारक आहे. व्यवस्थापनाच्या आवश्यकतेनुसार मंगळवार, शुक्रवार, पौर्णिमा, शारदीय नवरात्र महोत्सव, व सुट्ट्याचे कालावधीत तात्पुरते जादा कंत्राटी कामगारांची मागणी केल्यास ते पुरविणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. निवीदाधारकाने वर्क ऑर्डरप्रमाणे कंत्राटी मनुष्यबळपुरेसे संख्येने न पुरविल्यास, प्रतिदिनी प्रति मनुष्यबळरूपये ५० /- प्रमाणे दंड कंत्राटी बिलातुन वसुल / कपात करणेत येईल. |
| १२ | कंत्राटदाराने निवीदा मंजुर झाल्यानंतर करारनामा करतेवेळी त्यांचेमार्फत पुरविलेल्या अकुशल,कुशल कामगारांची व सुरक्षा रक्षकांची संपुर्ण नांवे, पत्ते व त्यांचे जन्मतारिख दाखले, दोन पासपोर्ट साईज फोटो, मतदान, आधार ओळखपत्र संस्थानला देणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील, तसेच सर्व सुरक्षा कर्मचाऱ्यांची आवश्यकतेनुसार चारित्र्य पडताळणी करून, पोलीस तपासणी अहवाल (Police Verfication Report ) देणे संबंधीत कंत्राटदारावर बंधनकारक आहे. |
| १३ | सुरक्षा रक्षकांस फायर फायटींग, प्रथमोपचार व जमावावर नियंत्रण ठेवणेचे प्रशिक्षण दिलेले असणे आवश्यक आहे. कंत्राटी पध्दतीने सुरक्षा मनुष्यबळपुरविणेपुर्वी संबंधीत सुरक्षा एजन्सीने त्यांना प्रशिक्षण ( Training ) देणे आवश्यक असुन वेळोवेळी प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. ते त्यांचेवर बंधंनकारक आहे. |
| १४ | कंत्राटदाराकडुन संस्थानला पुरविण्यात येणारे कंत्राटी कामगारांना युनिफॉर्म, ओळखपत्र, ड्युटी कार्ड पुरविणेची जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर राहील व त्या कामी येणारा खर्च कंत्राटदारास स्वतः करावा लागेल. |
| १५ | कंत्राटदार व त्यांचेमार्फत पुरविण्यात येणारे कंत्राटी कामगार यांच्यात काही विवाद अथवा तंटा उपस्थित झाल्यास तो सोडविण्याची पुर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्याची तोषीस अथवा झळ संस्थानला लागणार नाही याची खबरदारी पुर्ण कंत्राटदारावर बंधनकारक राहील. |

| | |
|---|---|
| १६ | मा.विश्वस्त मंडळ समितीचे सभेमध्ये चर्चा व वाटाघाटीव्दारे निश्चित केलेल्या दरामध्ये कोणत्याही सबबीवर कंत्राटदारास अथवा त्याने पुरविलेल्या कंत्राटी कामगारास दरवाढ मागता येणार नाही. सदर दरामध्ये वाढ करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही. |
| १७ | निवीदाधारकाने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यास कामगार नुकसान भरपाई (वर्कमन कॉम्पेनसेन ॲक्ट,१९२३ ) किंवा प्रचलित कायद्यानुसार नुकसान भरपाई द्यावयाची झाल्यास त्याबाबत संपुर्ण जबाबदारी निवीदाधारकांवर राहील. त्याचप्रमाणे वर्कमेन कॉम्पेनसेशन ॲक्टचे तरतुदीस अनुसरून कंत्राटी कामगारांची विमा पॉलीसी घेणे व सरद विमा पॉलीसीची प्रमाणीत प्रत स्वतः होवून संस्थानकडे दाखल करणे संबंधीत एजन्सीवर बंधनकारक राहील. |
| १८ | .एम्प्लॉईज प्रॉव्हीडंट फंड ॲण्ड मिसलिनियस प्रोव्हीजन ॲक्ट,१९५२ नुसार कंत्राटदाराकडे भविष्यनिर्वाह निधीचा महाराष्ट्रातील रिजनल प्रॉव्हीडंट फंड कमिशनर ऑफीस, अथवा नाशिकविभाग, नाशिक यांचेकडील स्वतंत्र प्रॉव्हीडंट फंड कोड नंबर असणे आवश्यक आहे. भविष्य निर्वाह निधीचा स्वतंत्र कोड नंबर संबंधीत ॲथॉरिटीकडुन घेणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. भविष्य निर्वाह निधीचा स्वतंत्र कोड नंबर नसलेल्या ठेकेदारांची / कंत्राटदाराची निवीदा विचारात घेतली जाणार नाही.<br>- तसेच कर्मचारी राज्य विमा निगम यांचे कडे सदरील संस्था नोंदणीकृत असावी दर महिन्याला कंत्राटी कामगारांचे पगार पत्रकातुन कपात करून संबंधती ॲथॉरिटीकडे भरणा करणे बंधनकारक असेल. |
| १९ | मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ चे कलम ६ ब ब नुसार प्रत्येक कॅलेंडर वर्षाचे माहे जुन व माहे डिसेंबर या महिण्याचे कंत्राटी कामगारांचे पगार पत्रकातुन सर्व कंत्राटी कामगारांची नियमानुसार विहित दराने वेलफेअर फंडाची वर्गणी ( कामगार हिस्सा ) कपात करून, तसेच मालकाच्या हिश्याची वेलफेअर फंडाची वर्गणी कंत्राटदाराने स्वतः जमा करावयाची आहे व अशा कामगार तसेच मालक वर्गणीच्या एकत्रीत रक्कमेचा भरणा प्रत्येक कॅलेंडर वर्षाचे १५ जुलै व १५ जानेवारी पुर्वी चेक / डिमांड ड्राफ्टव्दारे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, हुतात्मा बाबु गेणु, मुंबई गिरणी कामगार क्रिडा भवन, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन,मुंबई - ४०० ०१३ यांचेकडे विहीत विवरणपत्रासोबत कंत्राटदाराने करावयाच आहे. सदर कामगार कल्याण निधी भरणा करणेची कायदेशीर जबादारी कंत्राटदाराची राहील. |
| २० | किमान वेतन कायद्याप्रमाणे वेळोवेळी सुधारणेप्रमाणे सर्व सुरक्षा रक्षक व इतरांना विहीत वर्गवारीनुसार वेतन, महागाई भत्ते, सुट्टी आदि देण्याची / जबाबदारी कंत्राटदार यांची असेल. याबाबत देवस्थान न्यास कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. |
| २१ | कंत्राटदाराने महिना भरल्यानंतर पुढील महिण्याच्या दोन तारखेपर्यंत त्यांचे कामाचे बिल हजेरीपटासह संस्थानचे संबंधीत खातेप्रमुख व अकौंटंट यांचेमार्फत तपासुन दाखल करणे आवश्यक आहे. हजेरीपट नोंदवहीत तसेच बायोमेट्रीक मशिनमध्ये नोंदविणे बंधनकारक असेल |
| २२ | सदर बिलाची रितसर पडताळणी केल्यानंतर आवश्यक कायदेशिर वजावटी करून बिलाची मंजुर रक्कम कंत्राटदारास अदा केली जाईल. |
| २३ | कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कामगारांचे वेतन महिना पुर्ण झालेनंतर पुढील महिण्याचे १० तारखेचे |

| | | |
|---|---|---|
| | आत बँक अकौटन्स डिपॉझीट पध्दतीने संस्थान प्रतिनिधीच्या उपस्थितीमध्ये संबंधीतांना अदा करणे कंत्राटदारावर नियमाप्रमाणे बंधनकारक राहील. कंत्राटी कामगाराचे पेमेंट वाटप विहीत मुदतीत म्हणजे महिना पुर्ण झालेनंतर पुढील महिण्याचे १० तारखेपर्यंत न केल्यास, ११ तारखेपासुन ते पेमेंट वाटप होईपर्यंत प्रत्येक दिवसास रूपये २००/- याप्रमाणे दंड कंत्राटदाराचे मासिक बिलातुन वसुल/ कपात करणेत येईल. तसेच कंत्राटी कामगारांचे हजेरीपत्रक, पगारपत्रक व इतर आवश्यक ते रेकार्ड कॉन्ट्रक्ट लेबर ॲक्ट प्रमाणे विहीत नमुण्यात ठेवावे लागेल. ते कंत्राटदारावर बंधनकारक राहील. कंत्राटी कामगारांचे वेतनाबाबत काही विवाद उपस्थित झाल्यास त्याची संपुर्ण कायदेशीर जबाबदारी कंत्राटदारावर राहील. |
| २४ | कंत्राटदाराने पुरविलेल्या कंत्राटी कामगाराचे भविष्य निर्वाह निधी, कामगार कल्याण निधी, व्यवसायकर, आयकर, टी.डी.एस., सर्व्हीस टॅक्स, इन्क्रीमेंट, वर्कमेन कॉम्पेनसेशन, इन्शुरन्स, सानुग्रह अनुदान, बोनस, घरभाडे भत्ता, पगारी सुट्ट्या, पगारी रजा, ई.एस.आय.सी.कॉन्ट्रीब्युशन,उपदान ( ग्रॅच्युटी ) व इतर आर्थिक बाबी इ.संबंधीची सर्व कायदेशीर जबाबदारी औद्योगिक व कामगार कायद्याचे तरतुदीनुसार कंत्राटदारावर राहील. संस्थान त्यासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही अथवा त्याची तोषीस व झळ संस्थानला लागणार नाही हे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. वरील सर्व कायदेशीर जबाबदारी गृहीत धरून, **कंत्राटदाराने निवीदेत दर नमुद करावयाचे आहे.** |
| | अ. कंत्राटदाराने पुरविलेल्या कंत्राटी कामगारांचे, कामगार कल्याण निधी, व्यवसायकर, आयकर, टी.डी.एस., वर्कमेन कॉम्पेनसेशन, घरभाडे, भत्ता, ई.एस.आय.सी., कॉन्ट्रीब्युशन,उपदान (ग्रॅच्युईटी) जी.एस.टी. कर व इतर तसेच अपघाती जीवीत विमा इ. संबंधीची सर्व कायदेशीर जबाबदारी औद्योगिक व कामगार कायद्याचे तरतुदी कंत्राटदारावर बंधनकारक राहील. संस्थान त्यासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही अथवा त्याची तोषीस झळ संस्थान प्रशासनाला लागणार नाही याची खबरदारी घेणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.<br>ब. वरील सर्व कायदेशीर जबाबदारी गृहीत धरून, कंत्राटदाराने व्यावसायिक निविदेमध्ये सेवा दर संस्थानकडून देण्यत येणाऱ्या वेतन दरावर नमूद करावयाचे आहेत.<br>क.संस्थानकडून कंत्राटदारास देण्यात येणारी रक्कम<br>किमान वेतन कायद्यानुसार महाराष्ट्र शासनाचे शॉप ॲण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ प्रमाणे अनुज्ञेय असणारे किमान वेतनदर तसेच मा.विश्वस्त मंडळाचे निर्णयानुसार सध्या देय असलेले वेतनदर ( महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी देय होणारे स्पेशल अलौन्ससह) याव्यतिरिक्त खालील तक्त्यात नमूद रक्कम अदा करणेत येईल. |

| अ. क्र. | तपशिल | संस्थानमार्फत अदा करणेत येणारे वेतन |
|---|---|---|
| १ | भविष्य निर्वाह निधी प्रशासकीय चार्जेससह | १३.०० % |
| २ | कर्मचारी राज्य विमा निग ( ESIC) | ३.२५ % |
| ३ | अपघाती विमा संरक्षण ( प्रत्यक्ष बिलानुसार) | रू. ७ लाखापर्यंतचा अपघात विमा प्रिमीअम रक्कम |

| | | |
|---|---|---|
| ४ | कंत्राटी कर्मचाऱ्याचे वेतनदराचे रक्कमेवर सर्व्हीस चार्जेस | |
| ५ | सानुग्रह अनुदान<br>( प्रत्येक वर्षी दिपावली सणाचे वेळी ) | ८.३३ % दराने |

उपरोक्त नमूद देयके व मोबदला हे कामगार कायदा / मा.विश्वस्त मंडळाने वेळोवेळी निश्चित केलेल्या दरानूसार देय्य राहतील. याव्यक्तरिक्त इतर कुठलीही रक्कम संस्थानकडून कंत्राटदारास अदा केली जाणार नाही व तशी रक्कम मागणी करणेचा कंत्राटदारास अधिकार राहणार नाही. इतर सर्व प्रकाराची आर्थिक देणी देणेची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराव राहील. त्याबाबत कंत्राटदाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२५ कंत्राटदाराकडुन संस्थानला पुरविण्यात येणाऱ्या कंत्राटी कामगारासंबंधीत कंत्राटी कामगार ( नियमन व निर्मुलन ) अधिनियम १९७० व महाराष्ट्र कंत्राटी कामगार ( नियमन व निर्मुलन ) नियम १९७१, पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६, किमान वेतन अधिनियम १९४८, व इतर औद्योगिक तसेच कामगार कायद्यांच्या तरतुदींचे पालन करण्याची व त्यानुसार विहीत नमुण्यात कायदेशीर दृष्ट्या आवश्यक ते सर्व रेकॉर्ड, दस्तऐवज ठेवण्याची  व संबंधीत ॲथॉरिटीला विवरण पत्रे पाठविण्याची, त्याबाबत वेळोवेळी कायदेशीर पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२६ कंत्राटदाराकडुन संस्थानला पुरविण्यात येणाऱ्या कंत्राटी कामगारांचे संदर्भात ठेवावयाचे सर्व प्रकारचे रेकॉर्डस, दस्तऐवज उदा.कंत्राटी कामगारांची प्रत्येक महिण्याची बिले, हजेरी रजिस्टर, पगारपत्रके,याद्या, विवरणपत्रे, प्रॉव्हीडंट फंड, सर्व्हिस टॅक्स, कामगार कल्याण निधी इत्यादी संदर्भातील सर्व कागदपत्रे व दस्तऐवज विहीत नमुण्यात कायदेशीर दृष्ट्या अचुक व परिपुर्ण ठेवण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर राहील.

२७ निवीदेसोबत बयाणा रक्कम रू.५००००/- मात्र ( अक्षरी पन्नास हजार मात्र ) रक्कमेचा पाथर्डी येथील राष्ट्रीयकृत बँकेवरील संस्थानच्या नावे डिमांड ड्राफ्ट / ऑनलाईन व अनुषंगिक कागदपत्र जोडणे आवश्यक असुन ते संबंधीत एजन्सीवर बंधनकारक आहे. अन्यथा सदरची निवीदा अपात्र समजणेत येईल. चेक स्विकारले जाणार नाही.

२८ निवीदा मंजुर झाल्यानंतर करारनामा करतेवेळी निवीदाधारकास ( एकापेक्षा जास्त निवीवदाधारकांस कंत्राटी काम विभागुन दिले तरी देखील प्रत्येकास ) कामाची हमी म्हणून सुरक्षा अनामत रक्कम रू.१,००,०००/- मात्र ( अक्षरी रूपये एक लाख मात्र ) त्वरीत रोखीने अथवा ऑनलाईन / डिमांड ड्राफ्टने संस्थानकडे बिनव्याजी जमा करावी लागेल. कंत्राटपुर्ण झालेनंतर सदर रक्कम कंत्राटदारास बिनव्याजी परत करणेत येईल.

२९ निवीदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासुन सात दिवसाचे आत सदर कंत्राटदाराने रितसर लेखी करारनामा स्टॅम्पपेपरवर करून देणे त्यांचेवर बंधनकारक राहील व कायद्यानुसार आवश्यक असलेले रजिस्ट्रेशन, प्रॉव्हीडंट फंड नंबर, लेबर लायसेन्स, प्रायव्हेट सिक्युरिटी लायसेन्स, सिक्युरिटी डिपॉझिट इत्यादी सर्व बाबींची कायदेशीर पुर्तता कंत्राटदारास पंधरा दिवसात करावी लागेल. तसेच कंत्राटदारास त्यांचेकडील सर्व कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांची पोलीस विभागाकडुन चारित्र्य पडताळणी ( पोलीस व्हेरीफिकेशन ) करून

| | |
|---|---|
| | चारित्र्य पडताळणी अहवाल दोन महिण्याचे आत संस्थानला सादर करावा लागेल. |
| ३० | संस्थानला सदर कंत्राटदाराची आवश्यकता न वाटल्यास तो करार अथवा कंत्राट मुदतपुर्व विना नोटीस व विना नुकसान भरपाई रद्द करण्याची हक्क संस्थानने राखुन ठेवला आहे याबाबत कोणतीही भरपाई दिली जाणार नाही.<br>निवीदेतील कोणत्याही शर्ती / अटींचा भंग झाल्यास अथवा कंत्राटदाराने काम करण्याचे नाकारल्यास बयाणा तसेच अनामत रक्कम जप्त करणेत येईल व कंत्राट विनानोटीस किंवा विना नुकसान भरपाई रद्द करणेत येईल. त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही. सदरील निवीदा ही करारनाम्याचा भाग असेल. |
| ३१ | सदरचे कंत्राट हे उभयपक्षात करारनामा झाल्यानंतर ११ महिने ( अकरा महिने ) कालावधीसाठी प्रायोगित तत्वावर वैध राहील व तद्नंतर संस्थानच्या आवश्यकते व गरजेनुसार आहे त्याच अटी,शर्ती तसेच दरपत्रकास अनुसरून सदरचे कराराची / कॉन्टॅक्ट्रची मुदत पुढे वाढविली जाईल. तसेच कंत्राटदारास लेखी पत्रान्वये कळविणेत येईल. अथवा सदर करारनामा / कॉन्ट्रक्ट मुदत संपताच आपोआप संपुष्टात येईल. |
| ३२ | साथरोग, नैसर्गिक आपत्ती, अपाद स्थिती यामुळे कामकाजावर प्रभाव झालेमुळे त्याबाबत कोणतीही भरपाई मिळणार नाही. |
| ३२ | सुरक्षा रक्षक यांनी कोणताही संप, कामबंद, धरणे, देवस्थानच्या विरूध्द वर्तणूक खपवून घेतली जाणार नाही. |
| ३४ | माजी सैनिक सुरक्षा रक्षक व इतर सेवक कामांवर असतांना मोबाईल अथवा इतर इलेक्ट्रॉनिक वस्तुचा वापर / गैरवापर करता येणार नाही. याबाबत देवस्थानमार्फत दिलेल्या संपर्क व्यवस्थेचा वापर आवश्यकतेप्रमाणे कामकाजासाठी बंधनकारक असले. |
| ३५ | समाधानकारक सेवा न दिल्यास कोणत्याही क्षणी विना नोटीस ठेकेदाराचा करार रदद करणे वा सेवा समाप्तीचे, नवीन एजन्सी नियुक्तीचे सर्वाधिकार संस्थानकडे राखीव असतील. |
| ३६ | सर्व सुरक्षा रक्षक, सफाईकामगार व आचारी यांस देवस्थानव देवस्थानचे संलग्न ठिकाणी, तसेच देवस्थानचे सुचनेप्रमाणे इतर कोणतेही ठिकाणी सेवा द्यावी लागले. |
| ३७ | भविष्याची तरतुद म्हणनू निवीदेमध्ये पुरविणेत येणाऱ्या कामगारांचे संख्येत वाढ किंवा घट करण्याचा संस्थानचा अधिकार राहील व त्यानुसार कंत्राटदाराला कामगार पुरवावे लागतील. पुरविलेल्या कामगारांचे मासिक बिलानुसार सेवाआकार देण्यात येईल. |
| ३८ | आचारी- सदर सेवकास सर्व प्रकारचे शाहाकारी भोजन, नाष्टा आदि करण्याचा आवश्यक अनुभव असावा. देवस्थानचे सुचनेनूसार उमदेदवार योग्य नसल्यास व त्याऐवजी दुसरा योग्य उमेदवारास ठेकेदारास देणे बंधनकारक असेल. |
| ३९ | सफाई कामगार - आवश्यक गणवेश, प्रशिक्षण, वैद्यकीय तपासणी व प्रचलित कायद्यानुसार सर्व बाबींची कायदेशीर पूर्तता करणे कंत्राटदारावर बंधनकारक असेल. |
| ४० | कंम्पौंडर - शासन मान्यता संस्थेतून बी.एस्सी. नर्सींग / R.G.N.M. / G.N.M.उत्तीर्ण असावा. हॉस्पीटलमध्ये कामांचा अनूभव आवश्यक आहे. |

| | |
|---|---|
| ४१ | वायरमन - आयटीआय वायरमन परवानाधारक, वायरमन लाययन्स आवश्यक. |
| ४२ | निवीदा मोहोरबंद पाकिटात पाठवावी. सदर पाकिटावर कंत्राटी कामगार पुरविणेची निवीदा असा स्पष्ट उल्लेख असावा व पाठविस्याचे नांव, पुर्ण पत्ता व टेलीफोन नंबर पाकिटावर असावा. |
| ४३ | कोणतीही निवीदा स्विकारणेचा अगर नाकारणेचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखुन ठेवलेला आहे. त्याबद्दल कारण देणे संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही. |
| ४४ | या कराराबाबत काही वाद अथवा तंटा उत्पन्न झाल्यास तो पाथर्डी न्यायालयाचे न्यासकक्षेत राहील. |
| ४५ | देवस्थानविषयी बातमी / लिखान / वक्तव्ये करून बदनामी कोणत्याही प्रकारे व माध्यमातून करता येणार नाही. |
| ४६ | वेतनाबाबत घेतलेले व होणारे निर्णयाप्रमाणे कंत्राटी कर्मचाऱ्यांना वेतन अदा करणे आपणांवर बंधनकारक राहील. उपरोक्त नमूद वेतनदरामध्ये शासनाकडून वेळोवेळी जाहिर होणारे किमान वेतन दराप्रमाणे होणारी वाढ देय राहील. |
| | ( सुरेश भा. भणगे )<br>**मुख्य कार्यकारी अधिकारी**<br>श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे |
| | वरील प्रमाणे सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून मला मान्य व कबुल आहेत. प्रत्येक पानावर सही शिक्का करणे बंधनकारक असेल. |

( **निवीदाधारकाचे नांव व सही** )

**संस्थेचा गोल शिक्का**

सदरील निवीदा ही त्रि लिफीफा पध्दतीने भरण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| लिफाफा नं. १ | पानं. १ ते १० | मुळ निवीदा, अटी व शर्ती प्रत्येक पृष्ठांवर स्वाक्षरी करण्यात याव्यात. |
| लिफाटा नं. २ | पानं. ११ ते १६ | कामाचा अनुभव, संस्थेची उलाढाल, आवश्यक परवाने, हमीपत्र, बयाणा रक्कम तपशील सोबत जोडावीत. |
| लिफाफा नं. ३ | पान नं. १७ | सेवाशुल्क दर तपशील.( फायनाशियल बीड ) |

परिशिष्ठ १

# श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे

**ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर पिन ४१४१०२**

**मनुष्यबळ संख्या तपशील**

| अ.क्र. | कुशल वर्गवारी | संख्या | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | माजी सैनिक सुरक्षा रक्षक सुपरवायझर | १ | सैन्य दलात कमीत कमी १६ वर्ष सेवा पुर्ण असणे आवश्यक. |
| २ | माजी सैनिक सुरक्षा रक्षक | १५ | सैन्य दलात कमीत कमी १५ वर्ष सेवा पुर्ण असणे आवश्यक किंवा अग्नीविर सेवा |
| ३ | सुरक्षा रक्षक ( सिव्हीलयन) व पोलीस मित्र | ५ | सुरक्षाबाबतचे प्रशिक्षक आवश्यक |
| ४ | आचारी | १ | स्वयंपाक बनविण्याचा ५ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| ५ | वायरमन | २ | आयटीआय उत्तीर्ण, एक वर्ष कामाचा अनुभव |
| ६ | कंम्पौंडर / ब्रदर / नर्सिंग स्टाफ | ०१ | शासन मान्यता संस्थेतून बी.एस्सी. नर्सींग / R.G.N.M. / G.N.M.उत्तीर्ण असावा. हॉस्पीटलमध्ये कामांचा अनूभव आवश्यक आहे, देवस्थानचे मागणीप्रमाणे |
| ६ | अकुशल कामगार - मंदिर व मंदिर परिसर स्वच्छता कामासाठी अकुशल कामगार / मजुर | ०५ | |
| ७ | अकुशल कामगार - भोजनगृह व वसतीगृह येथे स्वयंपाक बनविणेकामी मदतनीस महिला कामगार - ११ ( फक्त महिला) | ११ | |
| | एकुण | ४१ | |

**तांत्रीक निविदा ( Technial Bid ) सोबत सादर करण्यात यावी. त्याशिवाय निविदेचा विचार केला जाणार नाही.**

परिशिष्ठ २

# श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे

ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर पिन ४१४१०२

१. मागील ३ वर्षात विविध आस्थापनांना आस्थापनानिहाय पुरविणेत आलेल्या कामगारांची संख्या दर्शविणारा खालीलप्रमाणे स्वसाक्षांकित तक्ता

अ. आर्थिक वर्ष २०२२-२०२३ ( दि. १ एप्रिल २०२२ ते दि. ३१ मार्च २०२३)

| अ.क्र. | ज्या आस्थापनेला कामगार पुरवण्यात आले त्या आस्थापनेचे नांव | आदेश क्रमांक व दिनांक | पुरविण्यात आलेल्या कामगारांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |

ब. आर्थिक वर्ष २०२३-२०२४ ( दि. १ एप्रिल २०२३ ते दि. ३१ मार्च २०२४)

| अ.क्र. | ज्या आस्थापनेला कामगार पुरवण्यात आले त्या आस्थापनेचे नांव | आदेश क्रमांक व दिनांक | पुरविण्यात आलेल्या कामगारांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |

क. आर्थिक वर्ष २०२४-२०२५ (दि. १ एप्रिल २०२४ ते दि. ३१ मार्च २०२५)

| अ.क्र. | ज्या आस्थापनेला कामगार पुरवण्यात आले त्या आस्थापनेचे नांव | आदेश क्रमांक व दिनांक | पुरविण्यात आलेल्या कामगारांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |

निविदेसोबत सादर करावयाचे कागदपत्रांचा तपशील

| | |
|---|---|
| **१** | **संस्था नोंदणीकृत असलेबाबत सक्षम प्राधीकारस्यांने दिलेले प्रमाणपत्र.** |
| **२** | **सुरक्षा एजन्सी नोंदणीकृत असल्याबाबतचे सक्षम प्राधीकारस्यांने दिलेले प्रमाणपत्र** |
| **३** | **निविदाधारकाचे मागील तीन वर्षाचे उलाढालीबाबत चार्टर्ड अकांऊटंट ( सी.ए.) यांचे प्रमाणपत्र ( २०२२-२०२३, २०२३ ते २०२४, २०२४-२०२५ )** |
| **४** | **२०२२ ते २०२३, २०२३ ते २०२४, २०२४ ते २०२५ चे इन्कम टॅक्स रिटर्न.** |
| **५** | **आयकर पॅन कार्डची सत्यप्रत** |
| **६** | **कामगार आयुक्त कार्यालयाकडील मागील ३ वर्षातील सर्व कामांचे लेबर लायसेन्सची वर्षनिहाय सत्यप्रती.** |
| **७** | **इतर ठिकाणी काम करत असलेले मागील तीन वर्षातील वर्कऑर्डर / करारनामे ( मनुष्यबळसंख्येसह )** |
| **८** | **PF CODE ACCOUNTS NUMBER रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची सत्यप्रत** |
| **९** | **ESIC CODE ACCOUNTS NUMBER रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची सत्यप्रत** |
| **१०** | **व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.** |
| **११** | **बँक खाते पास बुकची सत्यप्रत** |
| **१२** | **हमीपत्र ( नमुना पानं न.९ प्रमाणे )** |

**आपला / आपली विश्वासू,**

**( निविदाधारकांची सही व नांव )**

**उपरोक्त संपूर्ण कागदपत्रे अनुक्रमणिका तयार करून पृष्ठांकन करून जोडण्यात यावी.**

# - हमीपत्र -

मी / आम्ही संस्थानचे संकेतस्थळावर व दैनिक सकाळ, नगरटाईम्स या वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली **माजी सैनिक सुपरवाईझर, सुरक्षा रक्षक, स्वयंपाकी** ( **आचारी** )**, मजुर, चालक, सफाई कामगार पुरविणेबाबत** जाहिर निवीदेतील सर्व अटी व शर्ती वाचल्या असून त्या मला / आम्हाला मान्य आहेत.

मी / आम्ही कुठल्याही शासकीय / निमशासकीय / खाजगी संस्थेच्या काळ्या यादीत समावेश नाही. संस्थानने वेळोवेळी मागणीप्रमाणे मनुष्यबळसंख्या पुरविणे, नेमून दिलेली कामे व्यवस्थित करणे तसेच कार्यादेश प्राप्त झालेनंतर कामाची हमी निवीदेतील अटी व शर्तीनुसार रूपये ५०,०००/- मात्र अनामत रक्कम निविदा मंजूर झाल्यापासून ३० दिवसाचे आत मी / आम्ही संस्थानकडे आरटीजीएसव्दारे अथवा डिमांड ड्रॉफ्टव्दारे भरणा करणेची हमी देत आहे / आहोत.

**आपला / आपली विश्वासू,**

( **निविदाधारकांची सही व नांव** )

**संस्थेचा गोल शिक्का**

निवीदा क्रमांक -                                                          दिनांक      /      / २०२६

प्रति,
**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब**
श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे
ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर

**विषय :- कंत्राटी पध्दतीने माजी सैनिक सुपरवाईझर, सुरक्षा रक्षक, सफाई कामगार व विविध कामांकरिता मजुर पुरविणेबाबत.**

**संदर्भ :- श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे यांचेकडील जाहिरात दैनिक लोकमत / सकाळ दि. १२ मार्च २०२६.**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भाधीन जाहिरातीस अनुसरून व निवीदाबाबतच्या अटी-शर्ती पुर्ण वाचुन, समजुन घेऊन मी खालील सही करणार पुढीलप्रमाणे निवीदा सादर करीत आहे.

| नं. | माहिती | तपशील |
|---|---|---|
| १ | निवीदाधारकांचे नांव / फर्मचे नांव | |
| २ | संपर्कासाठी व्यक्तींचे नांव व दुरध्वनी क्रमांक | |
| ३ | पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता | |
| ४ | दुरध्वनी क्रमांक | ऑफीस<br>निवास |
| ५ | ई-मेल आयडी | |
| ६ | आयकर नोंदणी ( पॅन नंबर ) | |
| ७ | आधार क्रमांक | |
| ८ | फर्म नोंदणी क्रमांक | |
| ९ | जी.एस.टी.नोंदणी क्रमांक | |

| | | |
|---|---|---|
| **१०** | **बँकेचा तपशील** | |
| **११** | **खातेधारकांचे नांव -** | |
| | **बँकेचे नांव -** | |
| | **शाखा-** | |
| | **खाते क्र.-** | |
| | **आयएफएसी कोड-** | |
| | **खातेदार प्रकार ( चालू / बचत )** | |
| | **ठेकेददारीचे स्वरूप** ( भागीदारी / प्रा.लि./ पब्लिक लि.इ. ) सर्टीफिकेट सोबत जोडावे. | |
| **१२** | **अ. लेबर लायसन्स नंबर** | |
| | **ब. प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सी परवाना क्र.** | |
| | **क. प्रॉव्हीडंड फंड खाते क्रमांक** | |
| | **इ. ईएसआयसी नंबर** ( लागू असल्यास ) | |
| | **ई. इतर नोंदण्या / परवाने ( मा.जिल्हा पोलीस अधिक्षक / पसारा इ. )** | |
| **१३** | **बंदुक चालविण्याचा परवाना असलेल्या ( माजी सैनिक ) कर्मचाऱ्यांची संख्या** | |
| | **माजी सैनिक सुरक्षा रक्षकांची संख्या** | |
| **१४** | **इंडस्ट्रियल सिक्युरिटी ट्रेनिंग, फायर फायटींग इ. देण्याचीसुविधा आहे काय?** ( असल्यास ट्रेनिंग प्रमाणपत्र जोडावे ) | |
| **१५** | **या आधी कोणकोणत्या ठिकाणी सुरक्षा रक्षक पुरविले आहेत व त्या संस्थांची संख्या** | |
| **१६** | **सध्या कोणकोणत्या ठिकाणी माजी सैनिक सुरक्षा रक्षक पुरविण्यात आलेल्या संस्थेचे नांव, पत्ता,** | |

| | | | |
|---|---|---|---|
| | **फोन नंबरसह माहिती**.(कार्यादेश व यादी जोडावी.) | | |
| **१७** | **कामाचा पुर्वानुभव** | **एकुण वर्षे महिने** | |
| **१८** | **निवीदाधारकाची वार्षिक उलाढाल**<br>( सनदी लेखापरिक्षक यांचे प्रमाणपत्राची सत्यप्रत सोबत जोडावी.) | **सन २०२२-२३** | **रू.** |
| | | **सन २०२३-२४** | **रू.** |
| | | **सन २०२४-२५** | **रू.** |
| **१९** | बयाणा रक्कम ( ऑनलाईन किंवा डीडी )<br>( पावती सोबत जोडावी ) | **युटीआर क्र.**<br>**दिनांक : / ११ / २०२६** | |

अ. सध्याचे कुशल, अकुशल कामगाराचे प्रतिदिनी वेतन दर ( किमान वेतन दराप्रमाणे )

| अ.क्र | तपशील | मुळवेतन रू. | स्पेशल अलाऊन्स रू. | एकुण किमान मासिक वेतनदर रू. | प्रति दिन वेतन रू. | किमान प्रतिदिन वेतनावर देवस्थानव्दारा वाढीसह वेतनदर रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक सुपरवायझर (माजी सैनिक) | १०४४० | ३६१४ | १४०५४ | ५४०.५३ | **६३२** |
| २ | सुरक्षा रक्षक (माजी सैनिक) | १०४४० | ३६१४ | १४०५४ | ५४०.५३ | **६०५** |
| ३ | पोलीस मित्र (सुरक्षा रक्षक) | ९६६४ | ३६१४ | १३२७८ | ५१०.६९ | **५११** |
| ४ | आचारी | - | - | - | ८०० | **९२०** |
| ५ | स्वयंपाकी (महिला) | ८८२८ | ३६१४ | १२४४२ | ४७८.५३ | **४७९** |
| ६ | वायरमन | १०४४० | ३६१४ | १४०५४ | ५४०.५३ | **६०५** |
| ७ | सफाई कामगार | ८८२८ | ३६१४ | १२४४२ | ४७८.५३ | **४७९** |
| ८ | कंम्पौंडर / नर्सिंग स्टाफ | ९६६४ | ३६१४ | १३२७८ | ५१०.६९ | **५११** |

निवीदेतील सर्व अटी व शर्ती वाचल्या असून, न्यानुसार कंत्राटदारावर येणाऱ्या सर्व कायदेशीर आर्थिक जबाबदाऱ्या कर, कपाती, भत्ते, विमा इ. सर्व विचारात घेवून सपुर्णपणे स्विकारून आमचेमार्फत सदर निवीदा सादर करण्यात येत आहे.

आपला विश्वासू

एजन्सीचा शिक्का

**( निवीदाधारकाची सही व नांव )**

दिनांक :-

ठिकाण :-

## बिल ऑफ क्वांटिटीज) "Bill of Quantities)

| | |
|---|---|
| **संस्थेचे नांव** | **श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर** |
| **कामाचे स्वरूप** | **कंत्राटी पद्धतीने माजी सैनिक सुरक्षा रक्षक , स्वयंपाकी (आचारी), सफाई कामगार, कंम्पौंडर,वायरमन, रोजंदारी सेवक पुरविणेबाबतची निवीदा** |
| **निवीदा क्रमांक** | **०७ / २०२६** |
| **बोलीधारकाचे नांव** | |

| **नं.** | **तपशील** | **वेतनांच्या टक्केवारीत दर नोंदवावा** | |
|---|---|---|---|
| | | **अंकीत** | **अक्षरी** |
| **१** | **माजी सैनिक सुरक्षा रक्षक , स्वयंपाकी (आचारी), सफाई कामगार, कंम्पौंडर, वायरमन, रोजंदारी सेवक, (मजुर), महिला स्वयंपाकी, ( कुशल, अकुशल, अर्धकुशल)** | | |

**( निवीदा फॉर्ममधील अटी व शर्तीमध्ये नमुद केलेल्या सर्व कायदेशीर आर्थिक देणी व जबाबदाऱ्या विचारात घेवून, निवीदाधारकांनी सर्व्हीस चार्जेसची टक्केवारी नमूद करावी.).**

( सुचना - निल ( डॅश / अपूर्ण ) भरलेली निवीदा विचारात घेतली जाणार नाही यांची नोंद घेण्यात यावी. )

एजन्सीचा शिक्का

**( निवीदाधारकाची सही व नांव )**

दिनांक :-

ठिकाण :-